जा.क्र./नसका/स्थायी/CR-72/2014.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक :- 31.07.2014

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>**

**<u>स्थायी समितीच्या सभेची सूचना</u>**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण -2 मधील नियम क्र.3 (अ) अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र 3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दि.02.08.2014. रोजी दु.3.00 वा.** नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
नगरसचिव,
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
सभापती,
स्थायी समिती,
नांवाशमनपा, नांदेड.

प्रति,
श्री/श्रीमती ______________________________
सदस्य / सदस्या स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## <u>कार्यक्रम पत्रिका</u>

**विषय क्र.1**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.200 दि.28.01.2014 अन्वये नांदेड शहरात BOT तत्वार 50 शहर बस थांबे उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्यात आली. त्यामध्ये बि.एण्ड बि. इन्टरप्रायजेस नांदेड हे पात्र ठरले आहेत त्यांना प्रति बस स्टॅाप प्रति वर्ष (ज्या मध्ये जाहिरात कर व इतर सर्व बाबींचा कर/भाडे समाविष्ठ आहे) खालीलप्रमाणे रॉयल्टीचे दर आहेत.

| | |
|---|---|
| 1) 1st Year to 3rd Year | Rs. 5000/- |
| 2) 4th Year to 6th Year | Rs. 6000/- |
| 3) 7th Year to 9th Year | Rs. 7000/- |
| 4) 10th Year to 12th Year | Rs. 8000/- |
| 5) 13th Year to 14th Year | Rs. 9000/- |

**<u>सर्वसाधारण अटी व शर्तीः</u>**

1. सदरचा प्रकल्प हा कार्यारंभ आदेश दिल्यापासुन 6 महिन्याचे नंतर जी तारीख निश्चित होईल त्या तारखेपासुन 15 वर्षाचे कालावधीसाठी राहील. 15 वर्षानंतर सर्व बस स्टॅाप सुस्थितीत अभिकर्त्यास महानगरपालिकेस हस्तांतरित करावे लागतील.

2. कार्यारंभ आदेश दिल्याचे नंतर 6 महिण्याचे आत सर्व 50 बसस्टॉप उभारणे आवश्यक आहे नसता 6 महिण्याचे नंतर सर्व 50 बसस्टॉपचे रॉयल्टीची रक्कम मनपा फंडात जमा करावी लागेल. विलंबास 15% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

3. प्रत्येक बस स्टॉपला पुर्ण जाहिरात क्षेत्राच्या 10% जागा महानगरपालिकेच्या जाहिरातीसाठी राखीव ठेवावी लागेल (जी अभिकर्ता निश्चित करेल) या जागेत बसचे वेळापत्राक, सामाजिक संदेश महानगरपालिकेने वेळोवेळी कार्यक्रमानुसार तयार केलेले संदेश/जाहिराती लावण्याचा अधिकार महानगरपालिकेचा राहील.

4. प्रत्येक बस स्टॉपशेजारी 50 स्क्वेअर फुट आकाराचे बांधकाम एम.यु.सी.(Multi Utility Counter), ATM साठी करण्याचा अधिकारी अभिकर्त्यास राहील. अशा MUC चा वापर पेपर, पुस्तक, फ्रेश फ्रुट, मेडिकल्स, थंडपेय, पॅकेज्ड डेली निड्स विक्री करणे मोबाईल शॉपी, एटीएम साठी करता येईल. मद्य, तंबाखुजन्य पदार्थ, मांसाहारी पदार्थासाठी MUC चा वापर करता येणार नाही. आयुक्तांच्या मान्यतेने इतर प्रयोजनार्थ MUC चा वापर अनुज्ञेय असेल.

5. मद्य, तंबाखुजन्य पदार्थ, आक्षेपार्ह अशा जाहिराती बसस्टॉप वर करता येणार नाहीत. तसेच सामाजिक सलोखा बिघडवणा-या, दोन समाजात तेढ निर्माण होईल अशा जाहिराती करता येणार नाहीत.

6. ज्या बसस्टॉप शेजारी MUC साठी 50 स्क्वेअर फुट बांधकाम करणे शक्य नसेल त्याऐवजी दुस-या बस स्टॉप जवळ अतिरिक्त बांधकाम करण्याची मुभा अभिकर्त्यास राहील.

7. MUC चे प्रवेशद्वार फुटपाथच्या बाजुने राहील. रस्त्याच्या बाजुने करता येणार नाही.

8. बस स्टॉप च्या दोन्ही फुटपाथच्या साईडला बसस्टॉपचे नाव जसे कलामंदीर, आयटीआय, असे लिहिणे अभिकर्त्यास बंधनकारक असेल.

9. सर्व बस स्टॉप स्टेनलेस स्टिल व एम.एस. मध्ये आकर्षक असे बनविणे आवश्यक आहे. अभिकर्त्याने 3-4 डिझाईन देणे आवश्यक आहे.

10. प्रत्येक बसस्टॉपची किमान साईज लांबी 25 फुट रुंदी 6 फुट व उंची 10 फुट एवढी असावी व जास्तीत जास्त लांबी 40 फुट रुंदी 6 फुट व उंची 12 फुट एवढी असावी. बसस्टॉपमुळे फुटपाथवरील पादचा-यास चालण्यास अडचण होणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी.

11. MUC/ ATM किरायाने देण्यासंबंधीचा तसेच जाहिरातीचे उत्पन्न घेण्याचा अधिकार व त्याचे भाडे घेण्याचा अधिकार अभिकर्त्याचा राहील.

12. भविष्यात रस्ता रुंदीकरणात बसस्टॉपची जागा जात असल्यास त्या ऐवजी दुसरी जागा महानगरपालिका उपलब्ध करुन देईल.

13. विद्युत रोषणाई जाहिराती करणे, MUC/ ATM करिता विद्युत जोडणी, बांधकाम परवानगी देणे, इ. सर्व प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र महानगरपालिकेतर्फे देण्यात येईल.

14. बसस्टॉप बांधकाम करतांना कोणत्याही प्रकारचा जागेबाबतचा विरोध/अडथळा निर्माण झाल्यास, न्यायालयीन प्रकरणात जागेबाबतचा खर्च महानगरपालिका करेल तर जाहिराती व इतर बाबींच्या न्यायालयीन प्रकरणात अभिकर्ता खर्च करेल.

15. बसस्टॉप बांधकामामुळे अथ्वा बसस्टॉप उभारण्याचे नंतरच्या 15 वर्षाचे काळात कोणताही अपघात जीवित अथवा वित्तहानी झाल्यास त्यास अभिकर्ता जबाबदार राहील. त्यामुळे पुर्ण कालावधीसाठी सर्व बसस्टॉपचा विमा करणे अभिकर्त्यास आवश्यक असेल.

अनेकदा निविदा प्रक्रिया करुन देखील BOT तत्वार बसस्टॉप उभारण्यासाठी कुणीही इच्छुक नसल्यामुळे प्राप्त प्रतिसादातील प्राप्त दर मंजुर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या बसस्टॉप उभारणीत मनपाचा पैसा लागणार नाही. तसेच वर्षाकाठी ठराविक उत्पन्न प्राप्त होईल. प्रवाशांना सेवा उपलब्ध होवुन शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

सदरचा प्रस्ताव मंजुरीस्तव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.2**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस फिरणा-या श्वानांना पकडून त्यांचेवर शस्त्रक्रियेद्वारे निर्बिजीकरण व लसीकरण करुन (Animal Birth Control, Dog-Rule-2001) करुन त्यानंतर आवश्यक औषधोपचार व श्वानाची शस्त्रक्रियेची जखम पुर्ण बरी होईपर्यंत देखभाल करण्याची व त्यांना पुर्ववत त्याची ठिकाणी सोडण्याची मोहिम राबविल्याने मोकाट बेवारस कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवता येईल व शहरातील नागरिकांच्या श्वानदंशाचे प्रमाण कमी होईल व सामाजिक आरोग्य संवर्धनासाठी अत्यंत गरजेचे होईल. त्याप्रमाणे सदरील कामासाठी दैनिक दैनिक उद्याचा मराठवाडा व दैनिक ऊर्दू सांज या वृत्तपत्र जाहिर निविद सुचना जा.क्र.नांवाशमनपा/पशुसंवि/15/2014, दि.22/05/2014 अन्वये दिनांक 24/05/2014 रोजीच्या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच मनपात वेबसाईटवर सुध्दा प्रसिध्दी देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **संस्थेचे नाव** | **प्राप्त दर (प्रती श्वान)** |
|---|---|---|
| 1 | वेट्स सोसायटी फॉर अनिमल वेलफेअर अन्ड रुलर डेव्हलपमेंट हैद्राबाद. | रु.798/- |
| 2 | अनिमल वेलफेअर सोसायटी, हैद्राबाद. | रू.715/- |
| 3 | वेट्स फॉर अनिमल, कोपरर्ड हवली, ता.कराड, जि.सातारा | **कागदपत्रांच्या त्रुटीमुळे लिफाफा क्र.2 उघडण्यात आले नाही.** |
| 4 | पिपल्स फॉर अनिमल, सोलापूर, जि.सोलापूर यांची प्रती श्वान | रु.686/- |

पैकी पिपल्स फॉर अनिमल, सोलापूर, जि.सोलापूर यांची निविदा सर्वात कमी दराची असल्यामुळे सदरील संस्थेस वाटाघाटी बोलवून मा.उपायुक्त (प्रशासन) यांच्या समक्ष रु.655/- प्रती श्वान या दरात काम करण्यास संमती दर्शवली आहे. करीता सदरील संस्थेची निविदा मंजूर करुन कार्या.आदेश जा.क्र.नांवाशमनपा/पशुसंवि/32/2014 दि.26.06.2014 अन्वये निविदा मंजूर करुन कार्यालयीन आदेश जा.क्र.नांवाशमनपा/पशुसंवि/34/2014 दि.27.06.2014 अन्वये कार्यारंभ आदेश देऊन करारनामा करुन कामास सुरुवात करण्यात आली आहे. करीता सदरचे काम अत्यावश्यक सेवेत मोठत असल्यामुळे व सार्वजनिक हिताचे असल्यामुळे पिपल्स फॉर अनिमल, सोलापूर, जि.सोलापूर यांची नोंद घेण्यासाठी स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.3**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड अंतर्गत विविध विभागाचे संरक्षण करण्यासाठी लागणा-या सुरक्षारक्षक नोंदणीकृत संस्था/एजन्सीकडून पुरवठा करणे बाबत कार्या.प.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/7663/13, दि.08.01.2013 द्वारे दै.प्रजावाणी व दै.पुण्यनगरी वृत्तपत्रात जाहिर प्रगटनाद्वारे दरपत्राक मागविण्यात आले त्यानुसार व्यवस्थापक, कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस, नागपूर यांचे सर्वात कमी दराचे दरपत्र असल्यामुळे .प.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/8540/13, दि.14.02.2013 द्वारे संबंधीतांना आयुक्त कक्षात बोलावून चर्चेअंती उत्कृष्ट दर्जाची सेवा पुरविण्याची हमी घेतली. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, स्थायी समितीने संमत केलेला ठराव क्र.8, दि.25.04.2013 अन्वये सदर सुरक्षारक्षक एजन्सीचे दर सर्वात कमी असल्यामुळे त्यांचे दर मंजूर करुन त्यानुसार लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता नांवाशमनपा, स्थायी समिती सभेने दिली असल्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार (49) सुरक्षारक्षक व (3) शस्त्रधारी सुरक्षारक्षकांच्या सेवा पुरवठा करणे बाबत संबंधीत एजन्सी यांना

कार्यालयीन आदेश क्र. नांवाशमनपा/साप्रवि/1784/13, दि.30.04.2013 च्या आदेशान्वये आदेशीत करण्यात आले त्यानुसार सदर एजन्सीने दि.01.05.2013 रोजी सुरक्षा रक्षकांची सेवा महानगरपालिकेस पुरवठा केली आहे. तथापि, संबंधीत सुरक्षारक्षक एजन्सी यांची मुदत दि.30.04.2014 रोजी संपलयाने व दि.05.03.2014 रोजी भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2014 ची आदर्श आचारसंहिता लागू ज्यामुळे नवीन दरपत्रक निविदासुचा प्रसिध्द करता आली नाही. तसेच उपरोक्त सुरक्षरक्षक एजन्सीचे काम समाधानकारक असल्याबाबतचा सर्व संबंधीत विभागप्रमुख, मनपा नांदेड यांनी अभिप्राय दिलेला आहे. करिता उपरोक्त बाब लक्षाल घेता कलोटी सिक्युरीटी सर्व्हिसेस, नागपूर यांनी पुरवठा केलेले (49) सुरक्षारक्षक व (3) शस्त्रधारी सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे 01.05.2014 ते 30.04.2015 या एका वर्षासाठी पूर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात येते. करिता नोंद घेणेस्तव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.4**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड डॉ. राम मनोहर लोहिया वाचनालय शाखा रहेमतनगर येथील वाचनकक्ष श्रीमती सबिहा सुलताना पि.सिध्दी अहेमद यांच्या मालकीच्या इमारतीमध्ये भाडे तत्वावर घेवून चालविण्यात येत त्याची मुदत दिनांक 30.06.2013 रोजी संपली असून सदरील जागेचे भाडे सहाय्यक संचालक नगररचनाकार यांनी ठरवून दिलेल्या दरमहाभाडे रुपये 1530/- (अक्षरी रु.एक हजार पाचशे तीस फक्त) व विजबीलापोटी रु.200/- (अक्षरी रु.दोनशे फक्त) प्रमाणे सदरील वाचनकक्ष्ज्ञ दिनांक 01.07.2013 ते 30.09.2014 पर्यंत भाडेतत्वावर चालू ठेवणे करिता निर्णयास्तव स्थायी समितीसमोर सादर.

**विषय क्र.5**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड डॉ. राम मनोहर लोहिया वाचनालय व इतर शाखेतील रद्दी विक्री करण्यासाठी जा.क्र.ग्रं.वि./61/2014, दि.04.07.2014 अन्वये वृत्तपत्रे व मासिकांची रद्दी विक्रीचे दरपत्रक मागविण्यात आले असता खालील रद्दी खरेदीदारांचे रपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | वृत्तपत्राचे दर (प्रति किलो) | मासिकाचे दर (प्रति किलो) |
|---|---|---|---|
| 1. | बयान इंटरप्रायजेस नांदेड | रू.08.05 पैसे | रू.06.55 पैसे |
| 2. | सीमा इंटरप्रायजेस नांदेड | रु.07.51 पैसे | रु.06.25 पैसे |
| 3. | अ.खय्युम अ.रशीद स्क्रॅप मर्चंट नांदेड | रु.07.40 पैसे | रु.05.50 पैसे |

दरपत्रकाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार बयान इंटरप्रायजेस नांदेड यांची वृत्तपत्रे व मासिकांच्या रद्दीचे दर जास्त असल्यामुळे संबंधितांना वाटाघाटी अंती बोलविण्यांत आले असता बयान इंटरप्रायजेस नांदेड हे वाटाघाटी अंतर्गत वृत्तपत्रे रद्दी रुपये 9.70 पैसे प्रति किलो व मासिकांची रद्दी रु.08.25 पैसे प्रति किलो दर मंजूर करणे बाबत प्रकरण निर्णयास्तव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.6**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दित 2013-14 या आर्थिक वर्षासाठी झोन क्र. 1,2,3,4,5 व 6 मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्या करिता निविदा मागविण्यात आले असता झोन क्रं. 4 साठी सोहेल कंन्स्ट्रक्शन नांदेड, यांची सर्वात कमी दराची म्हणजे 17.50% जास्त दराची निविदा प्राप्त झाली निविदेतील दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधितांशी वाटाघाटी केली असता वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा 4% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली त्यानुसार स्थायी समिती ठराव क्रं.70 दि.11.07.2013 अन्वये निविदा मंजुर करण्यात आली. सोहेल कंन्स्ट्रक्शन नांदेड यांनी दि.11.02.2014 रोजी अर्ज देऊन साल सन 2014-15 मध्ये झोन क्रं. 4 ची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे त्यांना देण्यासाठी विनंती केली आहे. झोन क्रं. 4 ची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे सालसन 2013-

14 च्या मंजुर दरावर सोहेल कंन्स्ट्रक्शन नांदेड यांना दिल्यास महापालिकेचा आर्थिक फायदा होईल. करिता साल सन 2013-14 चे AMRC चे कंत्राटदार सोहेल कंन्स्ट्रक्शन नांदेड यांचेकडुन 2013-14 चे मंजुर दरावर पुढील आर्थिक वर्ष सालसन2014-15 मध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेणेसाठी (मुदतवाढ देणे बाबत) मान्यतेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रु. 50.00 लक्ष यास प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.7**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित प्र. क्र. 10 मध्ये विसावा नगर भागातील रस्ते ड्रेनेज लाईन टाकल्याने नादुरुस्त झालेले रस्ते WBM व सी. सी. पध्दतीने दुरुस्ती करण्याचे काम श्री.साई कन्ट्रक्शन, नांदेड या कंत्राटदाराकडुन दि.20/04/2013 रोजी चालु करण्यात आले सदर काम चालु असताना पावसाळयास सुरुवात झाली. Trench Restore झाल्यानंतर SDBC व Seal coat करण्याचे काम अंदाजपत्रकात प्रस्तवित करण्यात आले होते. पावसाळा चालु झाल्याने SDBC व Seal coat करण्याचे काम करता आले नाही. पावसाळा संपल्यावर कंत्राटदाराला उर्वरीत काम करणे बाबत सुचीत करण्यात आले, परंतु कंत्राटदाराकडुन आर्थिक अडचण असल्याचे सांगण्यात आले. व कामास विलंब झाला,सदर काम दि.10/06/2014 पर्यत आजघडीला कंत्राटदाराकडुन सदरचे काम पूर्ण झालेले नसल्याने या पूर्वी संबधीताकडुन जेवढे काम करुन घेण्यात आले त्यास रु.9,08,100/- एवढा खर्च झालेला आहे. कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री.साई कन्ट्रक्शन ,नांदेड यांचे मार्फत करुन घेण्यात आले असुन त्यास झालेला खर्च रु. 9,08,100/- साठी कार्योत्तर प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 कलम 2 नुसार स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.8**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दित 2013-14 या आर्थीक वर्षासाठी झोन क्र. 1,2,3,4,5 व 6 मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्या करिता निविदा मागविण्यात आले असता झोन क्रं. 5 साठी डि. एम. पाटील नांदेड, यांची सर्वात कमी दराची म्हणजे 17.50% जास्त दराची निविदा प्राप्त झाली. निविदेतील दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीताशी वाटाघाटी केली असता वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा 4% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.70 दि.11.07.2013 अन्वये निविदा मंजूर करण्यात आली. डि. एम. पाटील नांदेड यांनी दि. 24.03.2014 रोजी अर्ज देऊन साल-सन 2014-15 मध्ये झोन क्रं. 5 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे त्यांना देण्यासाठी विनंती केली आहे. झोन क्रं. 5 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे सालसन 2014-15 च्या मंजुर दरावर डि. एम. पाटील नांदेड यांना दिल्यास महापालिकेचा आर्थीक फायदा होईल. करिता साल-सन 2014-15 चे AMRC चे कंत्राटदार डि. एम. पाटील नांदेड यांचेकडुन 2014-15 चे मंजुर दरावर पुढील आर्थीक वर्ष साल-सन 2014-15 मध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेणेसाठी (मुदतवाढ देणे बाबत) मान्यतेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रु. 50.00 लक्ष यास प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.9**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दित 2013-14 या आर्थीक वर्षासाठी झोन क्र. 1,2,3,4,5 व 6 मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्या करिता निविदा मागविण्यात आले असता झोन क्रं. 6 साठी डि. एम. पाटील नांदेड, यांची सर्वात कमी दराची म्हणजे 17.86% जास्त दराची निविदा प्राप्त झाली. निविदेतील दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीताशी वाटाघाटी केली असता वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा 4% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. 70 दि.11.07.2013 अन्वये निविदा मंजुर करण्यात आली. डि. एम. पाटील नांदेड यांनी दि. 24.03.2014 रोजी अर्ज देऊन साल-सन 2014-15 मध्ये झोन क्रं. 6 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे त्यांना देण्यासाठी विनंती केली आहे. झोन क्रं. 6 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे सालसन 2014-15 च्या मंजुर दरावर डि. एम. पाटील नांदेड यांना दिल्यास महापालिकेचा आर्थीक फायदा होईल. करिता साल-सन

2014-15 चे AMRC चे कंत्राटदार डि. एम. पाटील नांदेड यांचेकडुन 2014-15 चे मंजुर दरावर पुढील आर्थीक वर्ष साल-सन 2014-15 मध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेणेसाठी (मुदतवाढ देणे बाबत) मान्यतेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रु. 50.00 लक्ष यास प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.10**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दित 2013-14 या आर्थीक वर्षासाठी झोन क्र. 1,2,3,4,5 व 6 मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्या करिता निविदा मागविण्यात आले असता झोन क्रं. 2 साठी श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांची सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रक दराची निविदा प्राप्त झाली. स्थायी समिती ठराव क्रं. 69 दि. 11.07.2013 अन्वये निविदा मंजुर करण्यात आली. श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांनी दि. 26.06.2014 रोजी अर्ज देऊन साल-सन 2014-15 मध्ये झोन क्रं. 2 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे त्यांना देण्यासाठी विनंती केली आहे. झोन क्रं. 2 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे साल-सन 2014-15 च्या अंदाजपत्रक दरावर श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांना दिल्यास महापालिकेचा आर्थीक फायदा होईल. करिता साल-सन 2014-15 चे AMRC चे कंत्राटदार श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांचेकडुन अंदाजपत्रक दरावर देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेणेसाठी मुदतवाढ देणे बाबत मान्यतेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रु. 50.00 लक्ष यास प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.11**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दित 2013-14 या आर्थीक वर्षासाठी झोन क्र. 1,2,3,4,5 व 6 मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्या करिता निविदा मागविण्यात आले असता झोन क्रं. 1 साठी श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांची सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रक दराची निविदा प्राप्त झाली. स्थायी समिती ठराव क्रं. 69 दि. 11.07.2013 अन्वये निविदा मंजुर करण्यात आली. श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांनी दि. 26.06.2014 रोजी अर्ज देऊन साल-सन 2014-15 मध्ये झोन क्रं. 1 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे त्यांना देण्यासाठी विनंती केली आहे. झोन क्रं. 1 ची वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे साल-सन 2014-15 च्या अंदाजपत्रक दरावर श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांना दिल्यास महापालिकेचा आर्थीक फायदा होईल. करिता साल-सन 2014-15 चे AMRC चे कंत्राटदार श्रध्दा ईलेक्टीकल इंजिनीअर कंपनी. नांदेड, यांचेकडुन अंदाजपत्रक दरावर देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेणेसाठी मुदतवाढ देणे बाबत मान्यतेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रु. 50.00 लक्ष यास प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.12**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका चे काळेश्वर पम्प हाऊस येथील असदवन जल शुध्दीकरण केंद्रा कडे पाणीपुरवठा करणा-या 375 HP पम्पाची दुरुस्ती करणे साठी उपअभियंता (यांत्रिकी) यांनी अहवाल सादर केला. सदर कामासाठी स्थानिक बाजारातून तीन दरपत्रके मागविण्यात आली त्या वरुन अंदाजपत्रक तयार केले. सदर कामासाठी अंदाजे रक्कम रुपये 543500/- खर्च अपेक्षित आहे. सदरील काम अंदाजपत्रकीय दरावर हकिम इंजिनियरींग ॲन्ड मेकॅनिकल वर्क्स, नांदेड यांच्याकडून करुन घेण्याच्या कामास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थिक मंजूरी प्रदान करणे साठी सन 2014-15 वर्षातील पाणीपुरवठा पम्प दुरुस्ती या लेखा शिर्षातील तरतूदीतून खर्च करणे करीता सदर प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर ठेवावा.

**विषय क्र.13**

काबरानगर जलशुध्दीकरण केंद्र यथील 35 MLD पंम्प हाऊस येथील पंम्प क्रमांक 3 हा नादुरुस्त झालेला आहे. 35MLD पंम्प हाऊस मध्ये एकुण तिन पंम्प हाऊस आहेत त्यामुळे एक पंम्प नादुरुस्त झाल्यामुळे तेथे स्टॅन्ड बाय पंम्प नसल्यामुळे येथील क्र. 3 चा पंम्प तातडीने दुरुस्त करुन घेणे अत्यंत आवश्यक होते. शहरात पाणीपुरवठा सुरळीत करणे

साठी अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेवुन हकीम इंजिनिअरिंग ॲन्ड मेकानिकल वर्क्स, नांदेड यांच्याकडुन स्थानिक बाजारातील योग्य दराप्रमाणे सदरील कामास रुपये 1,26,600/- (अक्षरी रुपये एक लाख सव्वीस हजार सहाशे फक्त) एवढा खर्च लागला असुन त्यास कार्योत्तर प्र.वा.आ. मान्यता देणेकरिता सदर प्रस्ताव येत्या स्थायी समीती समोर ठेवण्यात यावा.

**विषय क्र.14**

प्रभाग क्र. 33 फत्तेहबुरुज भाग हा उंच टेकडीवर असल्याने त्या ठिकाणच्या नागरीकांना पाणी पुरवठा होत नव्हता पाण्याची अडचण निर्माण होत होती. उन्हाळयाच्या दिवसात पाणीपुरवठा करणे आवश्यक होते करीता साई इलेक्ट्रीकल ॲन्ड इंजिनियरींग कामगार सहाकारी संस्था, नांदेड यांच्या कडून MJP DSR व रास्त दराप्रमाणे संस्थेकडून काम करुन घेण्यात आले झालेल्या खर्चास रुपये 84,760/- ला कार्योत्तर प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर ठेवावा.

**विषय क्र.15**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मलनिस्सारण योजने अंतर्गत नांदेड शहर मलनिस्सारण योजनेच्या 5 पंपीग स्टेशन व 2 मलशुध्दीकरण केंद्र चालविण्यासाठी (O&M) कंत्राटदार नेमणेसाठी मनपा सर्वसाधारण ठराव क्र. 56 दिनांक 30.04.2013 अन्वये मान्यता प्रदान केली आहे. त्या अनूषंगाने कंत्रादाराचा देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी कालावधी 5 वर्ष ठेवून ऑनलाईन पध्दतीने निविदा प्रसिध्द केली असता प्रस्तूत कामासाठी 4 निविदा विक्री झाले असून तांत्रिक अर्हता तपासणी अंतीर् प्राप्त सर्व निविदाधारक पात्र ठरत असून त्यांचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारक | अंदाजपत्रकीय किंमत | कंत्राटदाराने भरलेले दर | % जास्त |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. प्रगती कन्स्ट्रक्शन, चाकूर | 64291200 | 67505760 | 5 % जास्त |
| 2 | शारदा कन्स्ट्रक्शन ॲण्ड कॉर्पोरेशन, नांदेड | 64291200 | 68791584 | 7 % जास्त |
| 3 | अनूसया कन्स्ट्रक्शन, नांदेड | 64291200 | 70720320 | 10 % जास्त |
| 4 | विश्वराज इन्वा. ॲण्ड इन्फ्रा, नागपूर | 64291200 | 97497604 | 51.65 % जास्त |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त (4) निविदाधारका पैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. प्रगति कन्स्ट्र. चाकूर यांचे असून ते अंदाजपत्रक दरापेक्षा 5 % जास्त दराने प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेले दर हे जास्त वाटत असल्याने संबंधीत कंत्राटदारास वाटाघाटीसाठी दि. 29.05.2014 रोजी आयुक्त यांचे कक्षात बोलाविले असता कंत्राटदाराने दि. 29.05.2014 रोजी कार्यालयास अर्ज देवून उपस्थित राहणे शक्य होणार नसल्याचे कळवून पुढील तारीख देणेकरीता विनंती केली असता त्यानूसार पूनश्च दि. 10.06.2014 रोजी वाटाघाटीसाठी बोलाविले असता कंत्राटदाराने त्यांचे लेखी संमती पत्र दि. 22.06.2014 अन्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने भरलेले दर योग्य असून व किफायतशिर असल्याचे ते मान्य करण्यासाठी विनंती केली आहे.

त्याअनूषंगाने प्राप्त दर हे पुढील 5 वर्षापर्यंत असल्याने त्यामध्ये कोणतीही करवाढ/भाववाढ न करता मान्य करणेसाठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर मान्यते करीता सादर. तसेच सदरील कामावर मंजूर निविदे नूसार लागणा-या खर्चास साल सन 2014-15 या आर्थिक वर्षात मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षकातून खर्च करण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यतेकरीता सादर.

**विषय क्र.16**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दित प्रभाग क्रं 23 मध्ये शक्तीनगर भागात नविन (09) नग एल.टी.पोल उभारुन 70w सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर मे.नांदेड इंजिनिअरिंग कंपणी नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.185758/- (अक्षरी रु.एक लाख पंचेअंशी हजार सातशे अठ्ठावन फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.17**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दित झोन क्रं 5 अंतर्गत प्रभाग क्रं 36 वसरणी स्मशानभूमी येथे 4 नग टयूबूलार पोल उभारुन नविन 70 व्हॅट सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहेत. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर मे.नॅशनल इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.111798/- (अक्षरी रु.एक लाख अकरा हजार सातशे अठयान्नव फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.18**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत ओमेगा कंपणीचे एकूण (04) लिफ्ट असून त्या वारंवार नादुरुस्त होत असल्यामुळे सदरील लिफ्टची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती ओमेगा कंपणीकडून करुन घेणसाठी दर मागविण्यात आले असता संबंधितांनी एकूण (04) लिफ्टची एक वर्षासाठी दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी एकूण खर्च रु.438092/- ची दरपत्रक सादर केले आहेत त्यानुसार या कामासाठी M/s Omega Elevators,Ahmedabad यांची रु.438092/- ची दरपत्रक मंजूर करणेस्तव व संबंधितांनी मागणी केल्याप्रमाणे 100 % रक्कम अग्रीम स्वरुपात देणेसाठी मान्यतेस्तव सदरील प्रस्ताव याच सभेमध्ये कायम करणेस्तव सादर.

**विषय क्र.19**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दित प्रभाग क्रं 36 मध्ये वसरणी भागात नविन (50) नग 70w सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे.सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर श्री व्यंकटेश्वरा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड वर्क्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.177670/- (अक्षरी रु.एक लाख सत्यात्तर हजार सहाशे सत्तर फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.20**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत पद्मश्री शामराव कदम नगर (डॉक्टर लेन) भागात ड्रेनेज लाईनसाठी उपाययोजना केलेल्या आहेत काय ? केल्यास कोणत्या शिर्षकाखाली केल्या आहेत. यावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**सुचकः-** गफार खान गुलाम महंमद खान **अनुमोदकः-** श्रध्दा सुशिल चव्हाण

**विषय क्र.21**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत विसावानगर या भागात गणपती मंदिर ते रामनारायण काबरा यांचे घर ते इतर गल्ली मध्ये ड्रेनेज चे काम जे झालेले आहे. रस्ते खोदकामानंतर रस्ते दुरुस्तीची तरतुद त्या शिर्षकात आहे किंवा नाही, नसेल तर त्या भागात रोड करुन देण्यासाठी चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**सुचकः-** गफार खान गुलाम महंमद खान **अनुमोदकः-** श्रध्दा सुशिल चव्हाण

**विषय क्र.22**

**अपिल**

**प्रति,**
**मा.सभापती साहेब,**
स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**विषयः-** एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी गोठविण्यात आली व माझा निलंबन काळ गृहीत धरण्यात आल्याच्या मा. आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या आदेशाविरुध्द अपिलाबाबत.

**संदर्भः-** 1. कार्या.आदेश क्र. नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-6/10859/13 दिनांक 29.08.2013
2. कार्या.आदेश क्र. नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-6/27373/14 दिनांक 24.01.2014

**महोदय,**

मी चव्हाण आशिर्वाद भिकु नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड मला वरील संदर्भिय क्र.1 अन्वये पुढील दोषारोप लावून निलंबित करण्यात आले.

1. दोषारोप क्र.1 कत्तलखाना येथे जात नाही.

2. दोषारोप क्र.2 कोंडवाडा येथे जात नाही.

3. दोषारोप क्र.3 विभाग प्रमुखाशी आरमुड भाषा केल्या बाबत.

हे सर्व आरोप खोटे आहेत. मला निलंबनाच्या आधी कोणत्याही प्रकारे कार्यालयीन नोटीस न देता निलंबित करण्यात आले आहे. हे अन्यायकारक आहे. त्यांनी लावलेले दोषारोप क्र.1 कत्तलखान्यावर जात नाही. हे पुर्णतः चुकीचे असून, मी कत्तलखाना येथील कामावर उपस्थित होतो व याची नोंद हजेरी पटावर असून, त्याचा पगार देखील मला मिळालेला आहे. दोषारोप क्र.2 कोंडवाडयावर जात नाही. दोषारोप क्र.2 बाबतीत असे ही घडले आहे.

दोषारोप क्र.3 वरिष्ठांशी आरमुड भाषेचा वापर केल्या बाबत हे सुध्दा पुर्णतः चुकीचे आहे. तसेच संदर्भिय क्र.2 अन्वये मला कामावर रुजू करुन घेण्यासाठी व माझा निलंबन काळ गृहित धरुन माझी एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आली हे माझ्यावर अन्याय झालेला आहे.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 56(4) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्तांची निकट वरिष्ठ प्राधिकरण स्थायी समिती आहे. त्यानुसार मा. आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या माझ्या आदेशाविरुध्द हे अपिल दाखल करण्यात येत आहे.

तरी मे. साहेबांनी माझ्या अपिलाचा योग्य तो विचार करुन मला न्याय देण्यात यावा हि नम्र विनंती.

**अपिलार्थी,**
स्वाक्षरित/-
**चव्हाण आशिर्वाद भिकु**
लिपीक
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**स्वाक्षरीत/-**
नगरसचिव,
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
सभापती,
स्थायी समिती,
नांवाशमनपा, नांदेड.